BS Marketing Initiative

The Signature Event of MKSSS's HNIMR Kushagra 2026 with participation of 650+ students from 50+ colleges and institute from Pune



Grand Celebration at Nanavati Institute

The grand intercollege management festival "Kushagra 2026," organized by Maharshi Karve Stree Shikshan Samstha's Smt. Hiraben Nanavati Institute of Management and Research for Women (HNIMR), concluded with great enthusiasm and success. Based on the theme "YUVA ONE – AI provides the power, while HI provides the purpose," the festival provided a vibrant platform for students to showcase their managerial skills, creativity, innovation, and teamwork.

The festival witnessed an overwhelming response with 175 entries, participation of 650+ students from 50+ colleges, six competitive events, and the dedicated involvement of more than 250+ HNIMR student volunteers. The events included The Trading League, Mind Your Bizz, Pitch Tank, Mystery Masters, Captura, and One Shot 60, providing participants with opportunities to demonstrate practical management and problem-solving skills.

The event was inaugurated by Mr. P. V. Shastri, Secretary, MKSSS, and Dr. Priyanka Singh, Director, HNIMR. The theme emphasized the importance of balancing Artificial Intelligence with Human Intelligence, encouraging students to embrace technology while retaining human values, creativity, and purpose.

The festival was supported by generous contributions from sponsors including Venkey, TJSB Bank, Lokmanya Multipurpose Cooperative Society, Kuddle Nest Café.

The winners of the festival were students from MIT ADT., S.P. College, D.Y. Patil Management Studies, AISSMS, JSPM (Wagholi), MMCC, MM's IMERT,

SKNCOE, S. B. Patil Institute of Management and PUMBA who showcased exceptional talent, competitive spirit, and management skills across the events. The college that secured the award for maximum participation was also recognized for its enthusiastic involvement and contribution to the festival.

The successful execution of Kushagra 2026 was coordinated by Kalyani Kondhare, Veda Deshpande, and Shrawani Darange, under the guidance of faculty coordinators Dr. Ashok Pawar and Dr. Suvarna Dhamdhere, with the support of faculty members, non-teaching staff, and student volunteers.

Through Kushagra 2026, HNIMR successfully imparted valuable lessons in practical learning, leadership, and teamwork through innovation and collaboration. The importance of balancing technology with human intelligence in management.

Dr. Priyanka Singh, Director, HNIMR

Celebration of Dr. A.P.J. Abdul Kalam's Birth Anniversary – Vachan Prerna Divas and World Students' Day



Arihant Institute of Business Management, Library Department organised a programme to celebrate the birth anniversary of Dr. A.P.J. Abdul Kalam, the former President of India, renowned scientist, educationist, and an inspiration to millions of students. The occasion was observed as Vachan Prerna Divas (Reading Inspiration Day) and World Students' Day to encourage reading habits, promote education, and inspire students to pursue their dreams with dedication and determination.

The programme was attended by the Chief Advisor, Major General Dr. Ajay Pal Sir, and our respected Deputy Director, Dr. Swapnali Bhosale Madam, Dr. Amit Medhekar. Sir, all Faculty members, and students, who gathered in the auditorium to pay tribute to the great visionary and to celebrate his contributions to the nation.

During the programme, the Chief Advisor, Major General Dr. Ajay Pal Sir, delivered an insightful speech on the life, achievements, and contributions of Dr. A.P.J. Abdul Kalam. He highlighted Dr. Kalam's dedication to science, education, and nation-building, emphasising the importance of discipline, hard work, and continuous learning in students' lives.

Following this, Dr. Amit Medhekar Sir delivered an inspirational speech to the students. He encouraged them to develop positive thinking, set clear goals, work sincerely towards their ambitions, and cultivate a regular reading habit. His motivating words highlighted the importance of knowledge, self-confidence, perseverance, and moral values in achieving success.

The celebration aimed to create awareness about the importance of reading and to motivate students to follow Dr. Kalam's ideals of simplicity, dedication, and lifelong learning. The programme also provided an opportunity for faculty members and students to come together and pay tribute to one of India's most respected personalities.

The event was successfully organised by Ms. Sangeeta Sonawane, Librarian, with the support and participation of the institute's staff members. The programme concluded on an inspiring note, reinforcing the message that reading, education, and determination are essential for personal growth and nation-building.

तरूण पिढी शारिरीक साज शृंगाराकडे खूप लक्ष देत आहे

तरुण पिढी शारीरिक साज शृंगाराकडे खूप लक्ष देते; पण आपले संपूर्ण व्यक्तिमत्त्व उजळण्यास विसरते. थोडेसे मनावर घ्याल व थोडासा प्रयत्न कराल तर काही दिवसातच नक्कीच आकर्षक दिसू लागाल. त्यासाठी हा मोलाचा सल्ला.

० आपले व्यक्तिमत्त्व पारखा. जे दोष दिसतील ते नोट करून सुधारा. आपल्या शिक्षणाची, ज्ञानाची, सौंदर्याची व प्रतिष्ठेची पातळी वाढवा व वरचेवर त्याचे प्रदर्शनही करा.

० आपले वागणे व काम लोकांनी आपल्याला श्रेष्ठ मानून आपली प्राशंसा करावी असे असावे. आपलीच आपण स्तुती करू नका.

० समस्यांपासून दूर न पळता त्यांचा जोरदार सामना करा.

० नेहमी मधुर शब्दांचा वापर करा. असभ्य, हलक्या प्रतीचे शब्द वापरणे टाळा. त्याचा व्यक्तिमत्त्वावर वाईट परिणाम होतो. बोलताना संयम बाळगा.



योग्य वेळी योग्य शब्द वापरा. खूप मोठ्यांदा वा खूपच हलक्या आवाजात बोलू नका.

० हास्य व्यक्तिमत्त्व उजळत असते. हास्य पाहणाऱ्यालाही आनंदित करते व स्वत:लाही खूश राखते. हसणे म्हणजे डोळे मिचकावणे नव्हे तर डोळ्यांत व चेहऱ्यावर हास्य आणणे होय.

० मत्सर, मोह व घमेंड टाळा. हे माणसाचे सुखशांती हिरावतात, प्रगतीत अडथळा आणतात व अनेक शत्रू निर्माण करतात.

० नम्रता बाळगा. नम्रतेने माणसाला गती व मदत मिळते. ज्यामुळे यश मिळवणे सोपे होते.

० चुक स्वीकारण्याची सवय ठेवा. सॉरी, धन्यवाद, प्लीज म्हणण्याची सवय जडवून घ्या.

० त्वरित निर्णय घेण्याची क्षमता वाढवा. चटकन व योग्य निर्णय घेण्याची क्षमता आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी बनवते.

० हजर जबाबीपणाही व्यक्मित्त्व आकर्षक बनवतो.

० जर आपण सुंदर असाल तर आपले सौंदर्य आणखी उजळेल तसे नसेल, तर मेकअप व सौंदर्याद्वारे ते उजळा.

० आपल्याला शोभेल असा पोशाख करा. जादा जुनाट फॅशन तसेच अति मॉडर्न फॅशन टाळा.

० आपल्या वाईट सवयी, उदा. नखे खाणे, ओठ चावणे, दात दाखविणे, तोंड उघडे ठेवणे, डोळे मिचकावणे, अंगठा चोखणे इ. आले व्यक्तिमत्त्व डागाळतात. त्या त्वरित सोडा.

कच्चे दूध पिणे आरोग्यासाठी हितकर

चांगल्या स्वास्थ्याच्या प्राप्तीसाठी आणि ते टिकवून ठेवण्यासाठी काही नियमांचे काटेकोर पालन करणे जरुरी आहे. संतुलित आणि सुपाच्य भोजन, उचित व्यायाम आणि झोप तसेच आराम चांगल्या स्वास्थ्यासाठी आवश्यक आहे; परंतु आजही काही कुप्रथा आणि अंधश्रद्धा कायम आहेत. ज्यामुळे निरोगी राहण्याऐवजी आजार जडू शकतात. पाहूया अशाच काही रुढी.

० अशी सर्वसाधारण धारणा आहे की कच्चे दूध पिणे आरोग्यासाठी हितकर आहे. ग्रामीण भागामध्ये आजही कच्चे दूध पिले जाते. तथापि आधुनिक चिकित्सा विज्ञाना अनुसार अशा दुधात कित्येक आजारांचे रोमाणू असतात जे उलटी-जुलाब, टायफॉइडसारखे आजार उत्पन्न करू शकतात.

० काही लोक टोमॅटोला मांससदृश्य मानून खात नाहीत; परंतु टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन्स अशतात. लोक असेही मानतात की, विहिरीचे पाणी



पाचक आणि स्वास्थ्यासाठी चांगले असते. तथापि विहीर चांगल्याप्रकारे झाकलेली असावी अथवा त्या पाण्यात ब्लिचिंग पावडर टाकलेली असावी अन्यथा अशा पाण्याच्या सेवनाने पोटाचे विकार उत्पन्न होऊ शकतात.

० काही काही ग्रामीण वस्त्यांमध्ये एक वर्षापेक्षा कमी वयाच्या शिशूंना पाणी पाजले जात नाही. यामुळे त्यांना हिडायड्रेशन होऊ शकते. विशेष करून जुलाब-उलट्यांच्या दशेमध्ये पाणी पाजणे फार आवश्यक असते.

० व्रत-उपवास करणे एका मर्यादेपर्यंत ठीक आहे; परंतु अधिक उपवास केल्याने अनेक शारीरिक तक्रारी उत्पन्न होऊ शकतात. अशाने गॅस्ट्रिक अल्सर, डोकेदुखी आदी होऊ शकते. याशिवाय रक्ताची कमतरता, रक्तातील साखर कमी होणे वगैरे आजार होऊ शकतात. म्हणूनच आपल्या शारीरिक क्षमतेचे ध्यान ठेवून उपवास करावा. पेप्टिक अल्सर आणि मधुमेहाच्या रुग्णास डॉक्टर्स उपवास न करण्याचा सल्ला देतात.

० मागासलेल्या काही भागांत आजही कित्येक रोगांचे कारण, दैवीय प्रकोप आणि भूतप्रेत मानतात. येथील लोक रोगाचा इलाज न करता जादूटोणा आणि देवी-देवतांची पूजा करतात. यामुळे रोग बरा तर होत नाहीच, तर अन्य तक्रारी उत्पन्न होतात. आजही कित्येक रोगांत जसे हिस्टेरिया, मिर्गी, कावीळ, संधिवात, वात, लकवा, पोलिओ वगैरे आजारांवर योग्य इलाज न करता जादू-टीण्याचा सहारा घेतात. यामुळे रोग बरा होण्याऐवजी वाढतो.

० टायफॉइडसारख्या काही तापांमध्ये रुग्णाला खावयास दिले जात नाही आणि उपवास घडविला जातो. कित्येक वेळा अशा रुग्णांचा मृत्यूही होतो. अशा अंधश्रद्धांपासून दूर राहावे.

० तर कुष्ठरोगास पूर्वजन्माचे प्रतिफळ मानले जाते, तसेच या रोगास असाध्य रोग मानून इलाजही केला जात नाही. तथापि, आज हा रोग इलाजाने पूर्णपणे बरा होऊ शकतो.

० मागासलेल्या काही भागांमध्ये अंधश्रद्धेमुळे लहान मुलांना आजारांपासून बचाव करणाऱ्या लसी दिल्या जात नाहीत. असे करणे मुलांसाठी घातक ठरू शकते.

माउथवॉशचा वापर कसा करावा

टूथब्रश, डेंटल फ्लॉस, टूथपिक यांच्या वापराबरोबरच प्लाकच्या नियंत्रणासाठी काही रासासनिक द्रव्यांचा वापर दंतवैद्याकडून केला जातो. या माउथवॉशचा वापर खालील रुग्णांसाठी होतो.

रुग्णांची मौखिक दुर्गंधी येत असल्यास, हिरड्याचे आजार, मौखिक शस्त्रक्रियेनंतर, विविध आजारांसाठी दाखल असलेल्या रुग्णांमध्ये किंवा काढता-घालता न येणा-या कवळीचा वापर करणा-यांसाठी माउथवॉशचा वापर केला जातो.

विविध रासायनिक द्रव्यांमध्ये क्लोअरहेक्झिडिन सर्वात प्रभावी औषध आहे. ७० ते ९० टक्के रुग्णांमध्ये प्लाकमधील जंतू क्लोअरहेक्झिडिनमुळे नष्ट होतात. ते तोंडातील पेशीमध्ये जमा होते. हळूहळू तोंडातील जंतूवर परिणाम करून त्या नष्ट करतात. या औषधाचा एकदा गुळणा केल्यानंतर त्याचा जंतूनाशक गुण फक्त १२ तास राहतो. सकाळी टूथपेस्टने दात साफ करावेत. दोन तासांनी हे औषध वापरावेत. या औषधाने गुळणा केल्यानंतर एक ते दीड तास चहा-कॉफी घेऊ नये. रात्री



झोपण्यापूर्वी क्लोअरहेक्झिडिन माउथवॉशने गुळणा करून झोपावे. दिवसातून दोनवेळा आणि रात्री माउथवॉशचा वापर करावा.

या औषधांचा वापर डॉक्टरांनी सांगितलेल्या दिवसापुरता आणि योग्य मात्रेमध्ये करावा. औषधाचा वापर जास्त प्रमाणात केल्यास चांदी तसेच सिमेंट भरलेल्या दातावर चॉकलेटी डाग पडतात. दंतवैद्याकडे जाऊन डाग साफ करून घ्यावेत. औषधाचा वापर जास्त प्रमाणात केल्यास चवीची संवेदना जाऊ शकते. काही रुग्णांना ॲलर्जी असल्यास त्याचा वापर करू नये.

२ टक्के पोव्हिडॉन आयोडिन हे माउथवॉश म्हणून काही रुग्णांसाठी वापरले जाते. हिरड्याचे आजार, तोंडातील व्रण, मौखिक शस्त्रक्रियेनंतर सदर औषधाचा योग्य वापर केल्यास रोग लवकर बरा होतो. हे औषध ५ एमएल पाण्यामध्ये ५ एमएल औषध टाकून, ३० सेंकद गुळणा करावा. दंतक्षय टाळण्यासाठी किंवा दाताला क्लिप लावलेल्या रुग्णांसाठी सोडियम फ्लोराइड व ॲसिड्यूलेटेड फॉस्फेट फ्लोराइड असते. हे फ्लोराइड दंतक्षयास प्रतिबंध करतात. ट्रायलोझाम सोडियम क्लोराइड, गॅन्टेलझ इथील अल्कोहोल ही सर्व औषधी असलेला माउथवॉश बाजारात उपलब्ध असतात. या माउथवॉशमुळे दाताला कीड लागत नाही. दातावर प्लाक जमा होत नाही. तसेच मौखिक दुर्गंधीसाठी वरील सर्व माउथवॉश उपयुक्त ठरतात.

दरवाज्याजवळ पाणी ठेवणे लाभदायक पण...



अनेकांच्या घरात मुख्य प्रवेशद्वाराजवळ आतल्या बाजूला दिवाणखान्यात माशाचा टँक किंवा पाणी असलेला एखादा शो-पीस ठेवलेला असतो. केवळ चांगले दिसते म्हणून घरात ही सजावट केलेली नसते. वास्तुशास्त्रानुसार दरवाज्याजवळ पाणी असणे मंगलदायी समजले जाते. म्हणूनच पाण्याचा समावेश असलेले शो-पीस मांडलेले असतात.

दरवाज्याजवळ पाणी ठेवण्याचे वास्तुशास्त्रात काही नियम सांगितले गेले आहेत. या शास्त्रानुसार पाण्याचे भांडे किंवा वस्तू दरवाज्याजवळ नेहमी डाव्या बाजूलाच ठेवली पाहिजे. म्हणजे आपण घरात उभे राहून बाहेरच्या दिशेने पाहताना आपल्या डावीकडे जी बाजू असेल, तेथे ही वस्तू ठेवली पाहिजे.

पाणी किंवा पाण्याचा समावेश असलेला शो-पीस ठेवण्याची दिशा कटाक्षाने पाळली गेली पाहिजे, कारण दरवाजाच्या उजव्या बाजूला पाणी ठेवणे अतिशय अशुभ फळ देणारे असते. त्यामुळे आपल्या घरातील पुरुष अन्य स्त्रीकडे आकर्षित होऊ शकतो किंवा घरातील व्यक्तींच्या वैवाहिक जीवनात तिसऱ्या व्यक्तीचा प्रवेश होऊ शकतो. दरवाजाच्या दोन्ही बाजूस कधीही चुकूनही पाणी ठवू नये.

कोणत्याच स्त्रीला आवडत नाहीत पुरुषांच्या या गोष्टी

शास्त्रानुसार कौटुंबिक जीवनात आनंद, भरभराट,सुख-समृद्धी, शांतता नांदण्यासाठी गृहिणी सदैव तत्पर असते. आपला संसार स्वर्गासारखा सुंदर करण्यासाठी ती घरातील सर्वांच्या मनासारखे वागण्याच्या प्रयत्नात असते. भारतीय संस्कृतीनुसार प्रत्येक गृहिणी कुळलक्ष्मी असते, भगवती शक्ती असते त्यामुळे तिचा सन्मान केला गेला पाहिजे.

धार्मिक मान्यतेनुसार स्वर्ग देवी-देवतांचे स्थान मानले गेले आहे. स्वर्गाचा संबंध शुभ, मंगल, पवित्र भाव, विचार आणि कर्माशी जोडला गेला आहे. त्यामुळे जीवनातील प्रत्येक सुखद अनुभवाचा संबंध स्वर्गाशी जोडला जातो.

आपल्या कुटुंबाला स्वर्ग बनवण्यासाठी म्हणजे घरात सुख-समृद्धी नांदण्यासाठी पुरुषांनी पत्नीला सन्मान, आदर, प्रेम दिले तरच घरात वैभव नांदते असे म्हटले जाते.

शास्त्रामध्ये सांगितले आहे की - यत्र नार्यस्तु पूज्यंते तत्र रमन्ते देवता। अर्थ - ज्या घरात स्त्रीची पूजा म्हणजे सन्मान केला जातो, तेथे देवतांचा वास असतो. त्या



घरावर देवतांची सदैव कृपा राहते. याचा व्यावहारिक अर्थ असा आहे की, घरातील स्त्रीला नेहमी अपमानित केले जात असेल, तर त्याचा वाईट प्रभाव फक्त स्त्रीच्या मनावरच नाही, तर कुटुंबाच्या व्यवस्थेवर, संस्कारावर, जीवनमूल्यांवर पडतो.

अपमानित स्त्रीचा पुरुषावरील उठलेला भरवसा आणि ढळलेला आत्मविश्वास कुटुंबातील अशांतीला, कलहाला, संकटाना कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे घरातील स्त्रीला नेहमी प्रसन्न ठेवावे. घरातील स्त्री प्रसन्न असेल, तर घरात शांती राहते, सुख-समृद्धी नांदते. घरातील स्त्री खुश असेल, तर तुम्हाला तुमचे घर स्वर्गासारखे सुंदर दिसेल.

लहान मुलांची फेसबुकवर चॅटिंग; वय लपवून अकाऊंट उघडतात

हल्लीची टीनेजर पिढी खूपच हुशार असल्याचे मान्य करीत पालक त्यांना लहान वयातच मोबाईल फोन घेऊन देतात.' आमच्यावेळी कॉम्प्युटर आम्हाला माहीतदेखील नव्हता, पण आपला मुलगा कॉम्प्युटरवर गेम खेळतो याचे कोडकौतुक सांगितले जाते, परंतु 'टाइम्स'ने केलेल्या सर्वेक्षणानुसार हल्लीची अवघ्या ४ ते ७ या वयोगटातील मुले सतत नेटवर ऑनलाइन असतात. मुलाला पहिला मोबाईल फोन अवघ्या नवव्या वाढदिवसाला गिफ्ट मिळतो. ही आकडेवारी परदेशातील नसून आपल्या देशातील आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच सर्व्हे असून तो 'संडे टाइम्स'ने घेतला आहे. त्यानुसार ७० टक्के लहान मुलांनी आपले वय लपवत फेसबुकवर अकाऊंट उघडले आहे. ६४ टक्के मुलांचे पालकांचे मुलांशी मित्रत्वाचे नाते असून त्यांनीच त्यांना इंटरनेट उपलब्ध करून दिले आहे.

आजकालच्या धावपळीच्या जीवनात फेसबुक आणि ट्विटरच्या युगातही मुलांना एकटे वाटत आहे. अन्य एका सर्व्हेनुसार २५ टक्के किशोरवयीन मुलांना आपण नसलो



तरी त्यांच्या पालकांना काही फरक पडणार नाही असे वाटते. मुले सोशल नेटवर्किंग साइटमुळे आपल्यातील एकटेपणा दूर करीत असतील असा सर्वसाधारण समज यामुळे चुकीचा ठरला आहे. फोर्टीस हेल्थकेअरच्या वतीने केलेल्या या सर्व्हेनुसार २३६४ शाळांतील १३ ते १९ वयोगटातील मुलांचा वापर केला.

जालंधरमधील रक्षा नावाच्या एका तरुणीने फेसबुकवर तिची काही टारगट तरुणांनी बदनामी केल्याने होस्टेलच्या सिलिंग फॅनला गळफास लावून आत्महत्या केल्याचे प्रकरण ताजे आहे. या तरुणीने आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमुळे दोघा तरुणांना पोलिसांनी अटकही केली. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर दोन वेगवेगळया संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणातून आजच्या नेट सेव्ही आणि चॅटिंगच्या जंजाळात अडकलेल्या टीनेजर पिढीची अवस्था समोर आली आहे.

- २५ टक्के मुलांना पालकांना आपल्याशिवाय काही फरक पडणार नसल्याचे वाटते.

- ५० टक्के मुलांना त्यांच्या तणावाचे कारण अभ्यासाचे प्रेशर वाटते.

- १६ टक्के मुलांना वाटते त्यांना मित्रही समजून घेऊ शकत नाहीत.

- ३१ टक्के मुलांना ते एकटे असल्याचे वाटते.

- ६२ टक्के मुलांना आपले विचार कोणाबरोबरच शेअर करायला आवडत नाही. - २८ टक्के मुलांना मृत्यूसंबंधातील साहित्य, पुस्तके वाचायला आवडतात.

- प्रत्येक गोष्टीला ३८ टक्के मुले स्वत:ला जबाबदार मानतात. - ३४ टक्के मुलांना हे जीवन खूप कठीण वाटते. फेसबुक आणि इंटरनेटच्या जमान्यातील या सर्वेक्षणातून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, जरी मुले सोशली कनेक्ट असली तरी घरातील आजी-आजोबा आणि आईवडिलांशी त्यांचा संवाद कमी होत चालला आहे.

सेक्स आणि भावना यांची माणूस गल्लत करू लागला आहे

जेन नेक्ट यापलीकडे जाऊन ठामपणे म्हणते, स्त्री-पुरुषातली मैत्री, प्रेम, सहजीवन वगैरे सगळा बकवास आहे. खरी गोष्ट एकच सेक्स ! बाबा आदमच्या काळात लग्नाबिग्राची भानगडच नव्हती. तेव्हा रात्री स्त्री-पुरुष एकत्र यायचे तेव्हा सेक्स घडायचा ! ते वागणं प्रामाणिक होतं; कारण ते निसर्गाला धरुन होतं. आमची पिढीपण फक्त सेक्स मानते. लग्न, संसार वगैरे गोष्टी मानवी समाजानं निर्माण केल्या. धर्म आणि कायदा यांनी लग्नाचं रुपांतर लग्नाच्या बेडीत केलं. त्यामुळे भावनिक गुंतागुंत निर्माण झाली. घटस्फोटासारखे प्रश्न उत्पन्न झाले. सेक्स आणि भावना यांची माणूस गल्लत करु लागला; तेव्हापासून त्याचं जीवन दु:खी झालं. यापेक्षा सेक्स ही निव्वळ शारीरिक गरज आहे, हे मान्य करणं बरं.

फिल्मस्टार, खेळाडू, मॉडेल्स, आयटी प्रोफेशनल्स क्षेत्रांतल्या स्त्री-पुरुषांना हल्ली तरुण वयातच अवाच्या सवा पैसा मिळू लागला आहे. त्यांच्यापैकी बरेचजण रात्री ड्रिंक,डान्स आणि डेम या थ्रीडीमध्ये घालवणं म्हणजेच जीवन जगणं, अं समजते (डेम म्हणज स्त्री!) पैसेवाल्यांना समाज जाब विचारत नाही. उलट पैसेवाल्यांसाठी समाजाचे नियम व नीतीनियम बदलले जातात. म्हणूनच एका रात्रीसाठी भेटून सेक्स करणाऱ्या किंवा लग्नाशिवाय राहणाऱ्या स्त्री-पुरुषांना, इतकंच काय होमोसेक्युअल म्हणजे समलैंगिक संबंध ठेवणाऱ्या पुरुषांना आजचा समाज जाब विचारत नाही.

स्त्री-पुरुष संबंधांना आज जगात सर्वत्र सूट मिळते आहे, याचं कारण म्हणजे गर्भनिरोधक साधनांचं मुबलक प्रमाण ! सेक्समुळे एखाद्या देशाची लोकसंख्या तिथल्या नैसर्गिक जीवितसाधनांना मारक ठरते. तेव्हा सेक्स हा वैयक्तिक मामला राहात नाही. ती सामाजिक समस्या ठरते. भारत आणि चीन यांचा अनुभव घेतच आहेत. ही साधनंच उपलब्ध नव्हती. सेक्स तेव्हा समाज, धर्म आणि कायदा यांनी या संबंधांना नियंत्रित केलं. आता 'सेक्स की रात्र खतम' रिश्तों की बात खतम' हा मामला लोकसंख्या रोखण्यासाठी सरकारलाही पथ्यावर पडतो. त्यामुळे सेक्सचा भरपूर आनंद लुटा; पण सेफ कव्हर म्हणजे कंडोम वापरुन वृत्तपत्रांत धुंद, नशिला पोझेशनसह छापल्या जात आहेत. जे आपल्याला हवं तेच करायचं, जेव्हा हवं तेव्हा करायचं आणि स्वत: खेरीज कुणाचाही विचार करायचा नाही, या उद्दाम खाक्यानं जगणाऱ्या पुरुषाला या साधनांमुळे कोलितच हाती मिळालं आहे. मुल आणि संसार यांची जबाबदारी त्याला नकोच असते.

कुत्रा-मांजराप्रमाणे सेक्स करुन आपण नव्यानं मजा मारायला मोकळं राहावं. स्त्रीला हौस असेल, तर तिनं मुलांची जबाबदारी घ्यावी, हा ट्रेंड तरुण पिढीत बोकळात आहे. रात्री दारु पिऊन बेफाम पार्ट्या करायच्या नाही तर त्या धुंदीत भन्नाट वाहन उडवत गावभर उंडारायचं हा श्रीमंतांच्या नव्या पिढीचा स्वैराचार आपण बघतोच आहे. सोयीकरिता स्त्री वापरायची, पण तिची कोणतीच जबाबदारी नको. 'काम' झालं की तू तुझ्या घरी, मी माझ्या दोस्तांच्या (आणि दारुच्या) अड्ड्यावर, हे जगणं बहुसंख्य श्रीमंत तरुणांना मानवतं आहे बहुधा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीच नाही, तर अत्यंत श्रीमंत बनलेल्या स्त्रियांनाही ही लाईफस्टाईल पसंत असावी. मूलबाळ-सासू-सासरा यांची लोढणी हवीतच कशाला !

हास्यविनोद...

क्या हुआ तेरा वादा
तो तीला म्हणाला, क्या हुआ तेरा वादा ...
तो तीला म्हणाला, क्या हुआ तेरा वादा ...
ती म्हणाली,
आता मी दुसरा पकडलाय,
आज पासुन तु माझा दादा...

०००००००००००००००

साखरेचा डबा

नवरा रोज घरी साखरेचा डबा पाहतो आणि झोपतो.

बायको : तुम्ही रोज साखरेचा डबा का पाहता?

नवरा : अगं, मला रोज डॉक्टरने शुगर चेक करायला सांगितली आहे!

०००००००००००००००००००

गुन्हेगार कोण नवरा का बायको ?

गुन्हेगार कोण नवरा का बायको ? एक दिवसी नवरा आणि बायको झोपले होते, अचानक बायको स्वप्न बघून जोरात ओरडली लवकर पळ लवकर पळ माझा नवरा आला आहे. तिचा नवरा झोपेतून उठतो आणि खिडकीतून उडी मारतो.!!

SHRIRAM Asset Reconstruction

श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (एसएआरपीएल)

(विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे)

नोंदणीकृत कार्यालय: श्रीराम हाऊस, क्रमांक ४, बुर्किट रोड, टी. नगर, चेन्नई - ६०००१७. **कॉर्पोरेट कार्यालय:** युनिट क्रमांक एफएफ-ए-०५, ए विंग, पहिला मजला, आर्टगिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केट सिटी, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०, **फोन क्रमांक**-१८०० १२० २३८९; contact@truhomefinance.in

सार्वजनिक सूचना: स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-सह-विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ६, ८(६) व ९ तसेच परिशिष्ट-IV-A मधील तरतुदींनुसार स्थावर मालमत्तेच्या ई-लिलाव विक्रीची सूचना.

सर्व सामान्य जनतेस व विशेषत: कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित कर्जदाराकडे गहाण ठेवल्या आहेत/ आकारल्या आहेत, आता **श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**, विविध SARPL ट्रस्टच्या विश्वस्त म्हणून काम करत आहेत [नोंदणीकृत असाइनमेंट करारांद्वारे आर्थिक मालमत्तेच्या असाइनमेंटनुसार] SARFAEI कायद्याच्या कलम (5) अंतर्गत, खाली नमूद केलेल्या कर्जदारांसह विविध कर्जदारांशी संबंधित आर्थिक मालमत्ता, मूळ कर्जदाता/नियुक्तकर्ता ट्रूहोम फायनान्स लिमिटेड **(पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** कडून, त्याद्वारे निर्माण केलेल्या अंतर्निहित सुरक्षा हितासह, त्यावरील सर्व हक्क, मालकी आणि व्याजासह, मिळवले आहे. ज्याचा प्रत्यक्ष ताबा मूळ कर्जदाता/नियुक्तकर्ता/श्रीराम मालमत्ता पुनर्निर्माण प्रायव्हेट लिमिटेड (SARC) च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, म्हणजेच **SARC-ट्रस्ट-५ च्या विश्वस्त** म्हणून सुरक्षित धनको, कर्ज मंजुरीचा अभिहस्तांकक आणि असाइनर ट्रूहोम फायनान्स लिमिटेड [पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे] द्वारे वितरित केले आहे, नियम ६,८ आणि ९ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ नुसार तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार आणि जामीनदारांकडून SARPL म्हणजेच सुरक्षित कर्जदाराला, पुढील व्याज, शुल्क, खर्च इत्यादींसह थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या मिळावत ॲसेटच्या विक्रीद्वारे वसुलीसाठी, **"जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे ते"** या आधारावर विकले जाईल. कर्जदार आणि जामीनदारांचे तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले बोजा, जर असतील तर, राखीव किंमत, बयाणा रक्कम ठेव वाढीव बोली, लिलावाची तारीख आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे:

कर्ज खाते क्रमांक, ट्रस्ट असाइनरचे नाव आणि नाव / मूळ कर्जदात्याचे नाव	कर्जदार/सहकर्जदार/जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव	१३(२) मागणीची तारीख आणि रक्कमसूचना	राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली	लिलावाची तारीख व वेळ	संपर्क व्यक्ती तपशील - (एओ व निवारण समूह)
कर्ज खाते क्रमांक: SBTHSTRA0000031 आणि STUHSTRA0000049 ट्रस्ट खाते क्र.: SARC - TRUST-5 (ट्रूहोम फायनान्स लिमिटेड अंतर्गत)	**१. सौ. वास्टर शुभांगी विजय २. श्री. वास्टर विजय पुंडलिक**	मागणी नोटीस तारीख: ११.०४.२०२५कर्ज खाते क्र. SBTHSTRA0000031: दिनांक ०९-०४-२०२५ रोजी रु. ७,५७,०८५/- कर्ज खाते क्र. STUHSTRA0000049: दिनांक ०९-०४-२०२५ रोजी रु. ३,९३,७११/-	रु. ५,९२,३००/- **बोली वाढविणे :** रु. १०,०००/- **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी) (रुपयात)** (राखीव किमतीच्या १०%) : रु. ५९,२३०/- **ईएमडी सादर करण्याची अंतिम दिनांक ११ नोव्हेंबर, २०२६ वेळ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.००**	**१२ नोव्हेंबर २०२६ लिलावाची वेळ: दुपारी १२.३० ते ०१.३०**	**श्री. सुमेश मित्तल मो. क्र. ९९९३५८७९१७ श्री. मयुरेश जाधव मो. क्र. ९८३३०१७२२१ श्री. गणपत कावठेकर मो. क्र. ९७६४३३८८२२ मालमत्ता पाहणीची तारीख : ०३.११.२०२६ वेळ : दु १२.०० ते ३.०० वा**
ताबा दिनांक व ताबा प्रकार	**ज्ञात अधिभार**				
दिनांक २५-०८-२०२५ आणि भौतिक ताबा	ज्ञात नाही				

संपत्तीचे विवरण

सर्व भाग ज्यामध्ये फ्लॅट क्र. सी-४०५, चौथा मजला, सी विंग, ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ (built up area) २९.३३ चौ. मीटर आणि चटई क्षेत्रफळ (carpet area) २६.१३ चौ. मीटर आहे, "श्री कुरनेश्वर दर्शन", प्लॉट क्र. १, सर्व्हे क्र. १२९/१/४/२+१२९/१/५/२+१२/१/५/१/२, मौजे जकातवाडी, तालुका व जिल्हा सातारा - ४१५००२ येथे स्थित आहे.
चतुःसीमा (Boundaries): पूर्व: फ्लॅट क्र. सी-४०६ दक्षिण: मोकळी जागा पश्चिम: फ्लॅट क्र. सी-४०४ उत्तर: १२ मीटर रुंद रस्ता/पॅसेज

(१) विक्रीच्या सविस्तर अटी व शर्ती, बोली अर्ज आणि इतर माहितीसाठी सुरक्षित धनको/हक्कप्राप्त संस्था (Assignee) मेसर्स श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या https://www.shriramarc.com या संकेतस्थळाला किंवा आमची लिलाव एजन्सी सीरं इंडिया प्रा. लि. (गुडगाव, हरियाणा) यांच्या https://www.bankeauctions.com या संकेतस्थळाला भेट देऊ शकता. कोणत्याही मदतीसाठी तुम्ही support@bankeauctions.com या ईमेल आयडीवर संपर्क साधू शकता किंवा वरील तक्त्यात दिलेल्या आमच्या बिझनेस पार्टनरच्या संपर्क क्रमांकावर संपर्क करू शकता. या अटींवर बोलीदाराने बोली अर्जासोबत स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे. ही नोटीस अधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको यांच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील अपलोड करण्यात आली आहे.
(२) इच्छुक बोलीदारांनी त्यांची अनामत रक्कम (EMD) 'SARC-TRUST-5' च्या नावाचा डिमांड ड्राफ्ट (DD) किंवा RTGS/NEFT द्वारे खालील बँक खात्यात जमा करावी:खात्याचे नाव: SARC-TRUST 5बँकेचे नाव: आयसीआयसीआय बँक लिमिटेड (ICICI Bank Limited)शाखा: मुंबई - कमानी कुर्ला वेस्टखाते क्रमांक: 196205004628आयएफएससी कोड: ICIC0001962
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९(१) च्या तरतुदीनुसार] वैधानिक १५ दिवसांची विक्री नोटीसकर्जदार / गहाणखतदार (Mortgagors) / जामीनदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी ई-लिलावाच्या (e-Auction) तारखेपूर्वी वरील नमूद केलेली रक्कम, अद्ययावत व्याजासह आणि इतर अनुषंगिक खर्चासह भरून टाकावी. अन्यथा, मालमत्तेचा लिलाव / विक्री केली जाईल आणि काही थकबाकी उर्वरित राहिल्यास, ती व्याजासह व खर्चासह वसूल केली जाईल.

ठिकाण - सातारा
दिनांक - २३-१०-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी (श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड)
(विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे)